www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 168   वार मंगळवार दि. 04 मार्च २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ४   RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता
प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## टेम्पो अडवून बोल्ट आणि डिझेलची चोरी करून केली मारहाण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

जबरदस्तीने टेम्पो अडवून टेम्पो मधील बोल्ट आणि डिझेलची चोरी करून मारहाण केल्याप्रकरणी तीन अनोळखी इस्माविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुनील रेणके हे चिखली, पुणे येथे राहत असून 26 फेब्रुवारी रोजी टेम्पोमध्ये चिखली येथून गोण्यांमध्ये बोल्ट घेऊन ते निघाले. एक्सप्रेस हायवेने कामोठे टोलनाक्याच्या बाजूला पनवेल सायन हायवे रोडवर पहाटे आले असता त्यांच्या टेम्पोला काचेवर आणि दरवाजावर टोमणे मारून काच फोडण्यात आली. यावेळी तीन इस्मानी त्यांना मारहाण केली. त्यांनी टेम्पोतून उड्या मारल्या आणि ते पळून गेले. त्यावेळी त्यांनी डिझेलचा टाकीचे लॉक तोडून डिझेल काढून घेतले आणि टेम्पोचे नुकसान केले व टेम्पोमधील गोण्या चोरून नेल्या. त्यांच्याकडे स्विफ्ट डिझायर आणि एर्टिगा अशा गाड्या होत्या. 70 हजार 940 रुपयांचा मालाची चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

====================

## रस्त्यालगत पार्क केलेल्या कारची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

सेक्टर 13, नवीन पनवेल येथील रस्त्यालगत पार्क केलेल्या कारची चोरी केल्याप्रकरणी खान्देश्वर पोलीस ठाण्यात 28 फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सुशांत ढालपे हे नवीन पनवेल येथे राहत असून त्यांची एर्टिगा कार क्रमांक एम एच 02 डीएन 73 56 आहे. एर्टिगा कार सेक्टर 13, मँगो गार्डनच्या बाजूला, नवीन पनवेल येथे रस्त्यालगत पार्क केली होती. त्यांनी पाहणी केली असता कार दिसून आली नाही आणि त्या ठिकाणी काचा पडलेल्या दिसल्या. अनोळखी इसमाने कारची काच फोडून कार चोरी करून नेली.

=============

## बसच्या धडकेत 19 वर्षीय तरुण जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

बसने दिलेल्या धडकेत 19 वर्षीय तरुण जखमी झाला. या प्रकरणी बस चालक राजेंद्र पांडुरंग सावंत (राहणार कामोठे सेक्टर 6) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल कनोजिया हा कामोठे, सेक्टर सहा येथे राहत असून 27 फेब्रुवारी रोजी झेप्टो शॉप, कामोठे येथून ऑर्डर डिलिव्हरी करण्यासाठी कळंबोली सेक्टर 3 ई येथे आला होता. तो फायर ब्रिगेड समोरील रस्त्याने शिवसेना शाखेकडे जात असताना सिडको गार्डन समोरील रस्त्यावरून जात होता. यावेळी एनएमएमटी वाहन क्रमांक एम एच 43 एच 5348 चा त्याच्या दुचाकीला कट लागला आणि तो घसरून खाली पडला. या अपघातात डाव्या पायाच्या मांडीला आणि उजव्या हाताला फ्रॅक्चर झाले आहे.

============

## छावा चित्रपटाविषयी गप्पा मारत असताना केली मारहाण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**


छावा चित्रपटाविषयी गप्पा मारत असताना तीन इस्मानी लाकडी बांबूने मारहाण केल्याची घटना तळोजा परिसरात घडली. या प्रकरणी तिघां विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

महेश नेताजी चौधरी हे तळोजा फेस टू येथे राहत असून ते राहत असलेल्या मारवा सोसायटीच्या गेटवर आकाश उकर्डे याच्यासोबत छावा चित्रपटाबद्दल गप्पा मारत होते. यावेळी त्यांच्या पाठीमागे उभा असलेला अनोळखी इसमाने यांच्या जवळ येऊन शिवीगाळ केली. शिव्या कोणाला देतोस असे विचारले असता त्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्याने मोबाईल वरून कोणालातरी फोन केला आणि दोन इसमांना बोलावून घेतले. त्यांनी महेश आणि आकाश या दोघांना लाकडी बांबूने मारहाण केली. त्यानंतर ते तेथून पळून गेले. शकील शेख, त्याचा मुलगा आफताब व त्यांचा मित्र असे तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# “...हे त्यांची दलित-मागास समाजाविरोधातील मानसिकता दर्शवते”

## राहुल गांधी यांचा मोदी सरकारवर निशाणा

काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर थेट निशाणा साधला आहे. “भाजप सरकारकडून सामाजिक न्याय सुनिश्चित करणाऱ्या संवैधानिक संस्थांमधील महत्त्वाची पदे जाणूनबुजून रिक्त ठेवणे, हे त्यांची दलित-मागास समाजाविरोधातील मानसिकता दर्शवते,” असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. एवढेच नाही तर, राहुल गांधी यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगातील रिक्त पदे



भरण्यासंदर्भात त्यांनी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्र्यांना पत्र देखील लिहिले आहे. यासंदर्भात सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर संबंधित पत्राची कॉपी जोड राहुल गांधी यांनी म्हटले आहे, “देशभरात हजारो दलित आणि मागास लोक न्यायासाठी लढत आहेत. जातीनिहाय जनगणनेची मागणी सर्वत्र जोर धरत आहे. अशा वेळी, भाजप सरकारकडून सामाजिक न्याय सुनिश्चित करणाऱ्या संवैधानिक संस्थांमधील महत्त्वाची पदे जाणूनबुजून रिक्त ठेवणे, हे त्यांची दलित-मागास समाजाविरोधातील मानसिकता दर्शवते. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगातील रिक्त पदे भरण्याची मागणी करत, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्र्यांना पत्र लिहिले आहे.”

या पत्रात राहुल गांधी यांनी म्हटले आहे, “आपल्याला हे पत्र चांगले वाटेल, अशी मला आशा आहे. मी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (एनसीएससी) आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगातील (एनसीबीसी) रिक्त पदांसंदर्भात लिहीत आहे. संविधानात एनसीएससी आणि एनसीबीसीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्तीची तरतूद आहे. 7व्या एनसीएससीचे अध्यक्ष आणि दोन सदस्यांची नियुक्ती 3 मार्च, 2024 रोजी करण्यात आली होती. उपाध्यक्षाचे पद एक वर्षापासून रिक्त आहे. याशिवाय गेल्या आयोगात किमान दोन सदस्य होते.

देशभर में हजारों दलित-पिछड़े न्याय की लड़ाई लड़ रहे हैं। हर जगह जातिगत जनगणना की मांग गूंज रही है। ऐसे वक्त में भाजपा सरकार द्वारा जानबूझकर सामाजिक न्याय सुनिश्चित करने वाली संवैधानिक संस्थाओं में अहम पदों को ख़ाली रखना उनकी दलित-पिछड़ा विरोधी मानसिकता को दिखाता है। राहुल गांधी म्हणाले, मी सरकारला विनंती करतो की, त्यांनी एनसीएससी आणि एनसीबीसीतील रिक्त पदे लवकरात लवकर भरावेत आणि संस्थांना त्यांचे संवैधानिक जनादेश पूर्ण करण्यासाठी सशक्त करावे.

## महापालिका विभागातील 500 फुट सदनिकेच्या करास माफी मिळण्याची जनता दल (सेक्युलर) महाराष्ट्रतर्फे महापालिकेकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल महापालिका विभागातील 500 फुट घरांना कर माफ करण्याचे निवेदन आज जनता दल (सेक्युलर) महाराष्ट्रातर्फे पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांना निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. जनता दल (सेक्युलर), महाराष्ट्र सचिव सुनील पोतदार, पत्रकार किरण बाथम व इतर पदाधिकाऱ्यांनी आज पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त कैलास गावडे यांची भेट घेवून त्यांना या संदर्भात निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल महापालिकेची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असल्याने महापालिकेचे उत्पन्न वाढीस लागले आहे. महापालिका हद्दीत 500 फुट सदनिकांमध्ये राहणारे लोक अत्यल्प गटातील असून त्यातील 60% पेक्षा जास्त लोक हे ज्येष्ठ नागरिक आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रातील 500 फुट सदनिकेला कर माफी मिळावी म्हणून सर्व राजकीय पक्षाची भूमिका सकारात्मक आहे. तसेच पनवेल शेजारील असणाऱ्या नवी मुंबई महापालिकेने 500 फुट सदनिकेचा कर माफ केला आहे. पनवेल व नवी मुंबई महापालिकेने एकाच वेळी सदनिकेचा कर माफ करण्याची मागणी केली होती. असे असतानाही




नवी मुंबई महापालिकेचा कर माफ करण्यात आला. परंतु पनवेल महानगरपालिकेचा कर माफ न झाल्याने ती वंचित राहिली आहे. तरी याबाबत आयुक्त यांनी लक्ष घालून 500 फुटाच्या सदनिकेचा कर माफ करावा, ही मागणी केली आहे. या मागणीची प्रत कुमार स्वामी, केंद्रीय उद्योगमंत्री आणि जनता दल (सेक्युलर) पक्षाचे ज्येष्ठ नेते, नवी दिल्ली, देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई, एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, तथा नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई, नाथाभाऊ शेवाळे, अध्यक्ष, जनता दल (सेक्युलर), महाराष्ट्र, मुंबई यांना सुद्धा पाठविल्या आहेत.

## कोळगाव शिव रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणार - तहसिलदार नाईकवाडे

**दैनिक युवक आधार इम्पॅक्ट**
**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी :-राजेश भडांगे**




कोळगाव :- कोळगाव - रुई शिव रस्त्याअभावी वयोवृद्ध महिलेच्या अंत्यसंस्कारास अडथळा निर्माण झाला होता. महसूल प्रशासनाच्या मध्यस्थीने मार्ग काढत अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली. याबाबत दैनिक लोकनामा मध्ये आज वृत्त प्रकाशित होताच त्याची निफाडचे तहसिलदार नाईकवाडे यांनी गंभीर दखल घेतली असून हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यात येईल अशी माहिती दिली. कोळगाव येथील वयोवृद्ध गं.भा.चंद्रभागा यशवंत घोटेकर यांच्या निधनानंतर रस्त्याच्या अंतर्गत वादामुळे पार्थिवाला अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी मार्गच नव्हता. हा रस्ता गेल्या कित्येक वर्षांपासून अंतर्गत हेव्यादाव्यांमुळे वादात अडकलेला आहे. त्यामुळे रस्त्याभावी अंत्यसंस्कार कसे करायचे? या विवंचनेत घोटेकर कुटुंबीय होते. त्यांनी निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांना भ्रमणध्वनी वरून परिस्थिती कथन केली. परिस्थितीची जाणीव होताच, तहसिलदारांनी तातडीने देवगावचे मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर पगार, तलाठी विठ्ठल पोटरे, पुरुषोत्तम निकम, अमोल चव्हाण यांचे पथक घटनास्थळी पाठवले. रात्री १ वाजेपर्यंत प्रशासनाची बैठक झाली व चर्चेतून तात्पुरता मार्ग काढण्यात आला व अंत्यसंस्कार विधी पार पडला. प्रशासनाच्या वेगवान निर्णयामुळे एका कुटुंबाची तगमग संपली. त्याचबरोबर महसूल प्रशासनाच्या या कृतीचे परिसरात जोरदार स्वागत झाले. मात्र या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. सदर रस्ता महसूल प्रशासनाने वर्षभरापूर्वी खुला केला होता. त्यानंतरही या रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण झाले आहे. हा रस्ता प्राधान्याने मोजणीस घेऊन तारीख लावली होती. मात्र भूमी अभिलेख कर्मचाऱ्यास अचानक दुसरे काम लागले. त्यामुळे सदर वादी प्रतिवादी यांना नोटिसा काढण्यात येऊन पुन्हा मोजणी करण्यात येणार आहे.
- विशाल नाईकवाडे
तहसिलदार, निफाड

## गायिका उषा वारगडा यांचा केलेला ई-मेल व युट्युब चॅनेल आला परत युट्युब चॅनेल हाताळणारा मावस भावांनी हॅकरची केली बत्तीगुल..

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्त्या, आदिवासी समाजातील गायिका उषा वारगडा यांचा ई-मेल आणि युट्युब चॅनेल गुरुवार (दि. २७ फेब्रु.२५) रोजी पहाटे ३.०० वाजेच्या सुमारास हॅक केला होता. हे समजातच उषाताईने आपला युट्युब चॅनेल हाताळणारा मावस भाऊ कैलास मेंगाळ, मछिंद्र वाघ यांना सांगताच त्या दोघांनीही त्वरित ई-मेल, युट्युबला ट्विट आणि मेल केला होता. मात्र त्या अगोदरच हॅकरने पासवर्ड, रिकव्हर मोबाईल नंबर आणि युट्युब चॅनेलमध्ये s1mple असा बदल केला होता. हॅकरचे सध्या स्थितीतचे ठिकाण USA अमेरिकामध्ये दाखवत होता. तरीही युट्युब चॅनेल हाताळणारा मावस भाऊ कैलास मेंगाळ, मछिंद्र वाघ यांचे दोघांचेही ई-मेल आणि युट्युबकडे मेलच्या माध्यमातून बोलणं चालू होते. नंतर युट्युबने तो चॅनेल डिसाब्लेड केला. मात्र ई-मेलचा दुरुपयोग होऊ नये, म्हणून घडलेली सविस्तर माहिती सामाजिक कार्यकर्ते गणपत वारगडा, गायिका उषा वारगडा यांनी पनवेल पोलीस ठाण्यातील



वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगून शुक्रवार (दि. २८ फेब्रु.२५) रोजी लेख तक्रार दाखल केली होती.

युट्युबने डिसाब्लेड केलेला चॅनेल हॅकरने परत s1mple या नावे चालू केला असल्याचे युट्युबवर दिसून आला. मात्र युट्युब चॅनेल हाताळणारा मावस भाऊ कैलास मेंगाळ, मछिंद्र वाघ हे दोघेही सातत्याने ई-मेल आणि ट्विट करत राहिल्याने सोमवार (दि. ३ मार्च २५) रोजी हॅक केलेला उषा वारगडा यांनाच ई-मेल आणि युट्युब चॅनेल परत आला. आता युट्युबवर उषा वारगडा नाव टाकले कि चॅनेल दिसून येतच पण उषा वारगडा




यांची गाणी ही दिसून येतात. परंतु, ई-मेल आणि युट्युब चॅनेल परत आणतांना उषाताईचे मावस भाऊ कैलास मेंगाळ, मछिंद्र वाघ यांना तारेवरची कसरत करावी लागली. शेवठी USA दुसऱ्या देशातील लोकेशन दाखवणारा हॅकरची या दोघांनी बत्तीगुल केली.

## झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आमदार प्रशांत ठाकूर हेच करणार - पत्रकार शंकर वायदंडे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्वसामान्य माणसाची जाण आहे, झोपड्पट्टीवासियांच्या हितासाठी त्यांनी मागणी आणि त्या अनुषंगाने पाठपुरावा कायम ठेवला आहे, त्यामुळे झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आमदार प्रशांत ठाकूर हेच करणार आहेत, असा ठाम विश्वास नवीन पनवेल पंचशील नगर रहिवाशी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष पत्रकार शंकर वायदंडे यांनी व्यक्त केला. पत्रकार शंकर वायदंडे यांनी झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत मत व्यक्त करताना म्हंटले कि, एसआरए अर्थात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुंबई मधील झोपडपट्टी पुनर्वसन साठी १९९५ ला स्थापना झाली. बृहन्मुंबई महानगरपालिका परिसरातील उपनगरे, ठाणे, कल्याण, विरार, बदलापूर आणि पनवेल यांना ही लागू केली पनवेलला २०२० साली एसआरए लागू झाली असून प्रत्यक्ष पनवेल ची झोपडपट्ट्या भूखंडाची परिस्थिती पाहता काही खाजगी



मालकी, सिडको, रेल्वे, पालिका, एमआयडीसी आदी भूखंडावर झोपडपट्ट्या आहेत. एसआरए लागू होण्यासाठी ५१ टक्के पेक्षा जास्त लोकांनी योजनेत संमत होणे, भूखंड मालकाचे संमती, विकासक नेमणे अशा अटी आहेत. मुळात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी एकही झोपडीला बेघर होऊ देणार नाही पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्वांना परवडेल अशी घरे देण्याची घोषणा केली आहे आणि तशी मागणी आणि सातत्याने ते पाठपुरावा करत आहेत. असे असताना काही शेकाप पुरस्कृत माजी नगरसेवक व नेत्यांनी एसआरएचा घाट घातला असल्याचे पत्रकार शंकर वायदंडे यांनी लक्षात आणून दिले असून मुळात त्याला ५१ % लोक सहमत होणार नाहीत तसेच भूखंडावरील जागा मालकाची सहमती मिळणे शक्यता कमी आहे आणि सिडको हद्दीतील पंचशील नगर, नवनाथ नगर या झोपड्यांचे भूखंड विकास आराखड्यानुसार रेल्वेला दिला आहे त्यामुळे पंचशील नगर व नवनाथ नगर या झोपडपट्टीचे पुनर्वसन साठी सिडको संमती देईल का ? असा प्रश्नचिन्ह निर्माण झाला असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. एसआरए योजनेच्या अनुषंगाने सन २००० पर्यंतच्या झोपड्यांना मोफत तर २०१० पर्यंतच्या झोपड्यांना सशुल्क २ लाख ५० हजार भरून घरे देणार तर २०१० नंतरच्या झोपड्यांना अपात्र ठरवून पुन्हा बेघर होण्याची वेळ येईल. तसे होऊ नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व बांधवांना आश्वासित केल्याप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना सोबत महाराष्ट्र शासन व पालिका मिळून पुनर्वसन योजना आखणी केली आहे. आणि त्याचबरोबरीने प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सर्वेक्षणाचे काम देखील सुरु आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्वसामान्य माणसाची जाण आहे त्यामुळे त्यांनी या विषयी झोपड्पट्टीवासीयांसोबत बैठका घेऊन त्यांच्या सूचनाही ऐकून घेत त्या संदर्भात कार्यवाहीसाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्यासोबत बैठक घेतली. आणि पुढील कार्यवाहीला वेग दिला आहे. त्यामुळे घरांच्या संदर्भात दिशाभूल करण्यापासून झोपडपट्टी वासियांनी सावध रहावे, असे आवाहन करतानाच झोपडपट्टी पुनर्वसनसाठी आमदार प्रशांत ठाकूर अग्रेसर असून त्यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवावा आणि सर्वांनी आपल्या हक्कासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत रहावे, असेही आवाहन पत्रकार शंकर वायदंडे यांनी केले.

## डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे पनवेल विभागात स्वच्छता मोहीम



**दैनिक युवक आधार**
**केतन मंगलोरकर**
**पनवेल**

डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा मार्फत आदरणीय डॉ. श्री. अप्पासाहेब धर्माधिकारी आणि आदरणीय डॉ. श्री सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समाजोपयोगी कार्य राबविली जाते. त्याचप्रमाणे यावर्षी 2 मार्च 2025 रविवार रोजी महाराष्ट्रभर एकाचवेळेस स्वच्छता अभियान राबविले गेलें . पनवेल, न. पनवेल, खांदा कॉलनी येथील सर्व बाजारपेठा तसेच डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय ,पनवेल आणि डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात अनेक मान्यवर, सामाजिक संस्था, यांनी सहभाग घेतला. यात पनवेल 3709 कामोठे 1625 एकून 5334 श्रीसदस्यांनी सहभाग घेतला

## राष्ट्रीय एकता जनरल आणि माथाडी ट्रान्सपोर्ट कामगार संघाच्याची. पियरसन ड्रम कंपनीमध्ये नविन शाखेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी पनवेल**

दि.१मार्च २०२५ रोजी पनवेल तालुक्यात कामगार व नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे कामगार नेते विजय पाटील यांच्या कार्याचा धडाका पाहून आणि कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असतील असा विश्वास व्यक्त करुन पियरसन ड्रम कंपनीमध्ये राष्ट्रीय एकता जनरल आणि माथाडी ट्रान्सपोर्ट कामगार संघाच्या नविन शाखेचे उद्घाटन प्रमुख संघटक मा. कौशिक आनंद यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी अध्यक्ष विश्वनाथ भुवड, कार्याध्यक्ष अड मदन इंगळे, महासचिव,दिनेश होजगे, तसेच पनवेल तालुका पदाधिकारी उपाध्यक्ष जीवन पाटील प्रमुख संघटक वैभव भोईर व तालुका अध्यक्ष कामगार नेते विजय पाटील व कामगार संघटनेचे पदाधिकारी इतर कामगार कामगार आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कामगारांच्या न्याय हक्कासाठी राष्ट्रीय



एकता जनरल आणि माथाडी ट्रान्सपोर्ट कामगार संघटना सातत्याने प्रयत्नशील असून त्यांना न्याय मिळवून देतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यापूर्वीच्या कामगार संघटनेच्या माध्यमातून घोर निराशा झाली असून कामगारांच्या कोणत्याही प्रकारच्या समस्या सोडविण्यात आल्या नाहीत. त्यामुळे या संघटनेच्या माध्यमातून कामगारांना न्याय मिळेल असा विश्वास कामगार नेते विजय पाटील यांनी व्यक्त केला. कामगार युनियन स्थापन करण्यासाठीची प्रक्रिया पुर्ण झाली असून मॅनेजमेंटसी सखोल चर्चा करण्यात आली असे यावेळी सांगितले..

## 'शब्दमोती साहित्य मंच'आयोजित''साहित्य जल्लोष ''कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**-मुंबई-गुरुनाथ तिरपणकर**

२७फेब्रुवारीला मराठी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. त्याच अनुषंगाने'शब्दमोती साहित्य मंच'आयोजित साहित्य जल्लोष हा कार्यक्रम मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला बोरिवली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.निवृत्त पोलीस आयुक्त व जेष्ठ साहित्यिक रविकीरण पराडकर सर हे ह्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच जेष्ठ अर्थतज्ञ चंद्रशेखर ठाकूर ह्यांनी ह्या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.आकाशवाणीच्या निवेदिका पूजा काळे यांनी हा कार्यक्रमाचे दिमाखदार सूत्रसंचालन करुन कार्यक्रमात रंग भरले.ह्या कार्यक्रमात सुमारे चाळीस साहित्यिकांनी कथा,कविता,ललित वगैरे स्वलिखित साहित्य सादर करुन उपस्थितांची वाहव्वा मिळवली. संस्थेचे हितचिंतक श्री.सुबोध शृंगारपुरे ह्यांनी सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था केली.ह्या कार्यक्रमाचे आयोजन'शब्दमोती साहित्य मंच'चे प्रमुख आधारस्तंभ श्री.राजेंद्र चौधरी ह्यांनी केले.संस्थेच्या अध्यक्षा स्वाती शृंगारपुरे ह्यांनी सर्वांचे आभार मानले.



## करंजाडेतील हॉटेल साई परिवारमध्ये भेसळयुक्त पदार्थ

### माजी उपसरपंच यांची आरोग्य विभागाकडे लेखी तक्रार कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी -**

– करंजाडे वसाहतीमध्ये एका हॉटेलमध्ये भेसळयुक्त दुय्यम दर्जाचे पदार्थ विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्याने करंजाडे नागरिक आक्रमक झाले आहेत. त्याचबरोबर माजी उपसरपंच योगेंद्र कैकाडी यांनी हॉटेलवर कारवाई करण्याबाबत आरोग्य विभागाकडे धाव घेतली आहे करंजाडे येथील करंजाडे नोडमधित्व सेक्टर-०३ प्लॉट नं. 53 शॉप नं. १, विनायक सौलिटर इमारतीमध्ये आच्या कुल्फीवाले उर्फ साईपरिवार हॉटेलमध्ये पदार्थ खराब तयार केले जातं आहे. यावेळी हॉटेल चालकांना जाब विचारला असता उडवाउडवीचे उत्तर दिले जातं असल्याचे तक्रार अर्जामध्ये नमूद केले आहे. यावेळी संबंधित हॉटेलवर कारवाई करण्याबाबत पंचायत समितीतील आरोग्य विभागाकडे तक्रार करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी उप सरपंच योगेंद्र कैकाडी यांनी केली आहे.

## माझी सहा वर्षांची खासदारकी शेतकऱ्यांना साठी समर्पित आहे खा.डॉ.अजितजी गोपछडे

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड -**: गौपालन, दुग्धविकास, बायोगॅस,आणि नैसर्गिक शेती या क्षेत्रात दीर्घकालीन योजना आखून कार्य करणे आवश्यक आहे. वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव असला तरी शेतीत कामाचा थेट अनुभव नाही. मात्र, तज्ज्ञ सहकाऱ्यांच्या मदतीने या क्षेत्रात दीर्घकाळ काम करणार आहे.

माझी सहा वर्षांची खासदारकी पूर्णपणे शेतकऱ्यांना समर्पित असेल, असे आवाहन मी नांदेड येथे केलो आहे होणाऱ्या बायोगॅस व सहकारी दूध संस्था नोंदणी कार्यशाळेच्या पूर्वतयारीसाठी झालेल्या नियोजन बैठकीच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विविध स्वयंसेवी संस्था, शेतीतज्ज्ञ, दुग्ध उत्पादक, पशुपालक आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी या उपक्रमांना यश मिळेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे

# शेतीचा एक नवीन युग: महेश बल्लेवार या तरुणाच्या हातात..!

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी – महेश पेंन्दोर

यवतमाळ : बद्दल घडवणे: पांढरकवडा येथे आधुनिक शेतीचे नेतृत्व महेश बल्लेवार करतात. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा या गावाच्या मध्यभागी, तरुण शेतकरी महेश बल्लेवार शेतीच्या त्याच्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाने कृषी क्षेत्रात क्रांती घडवत आहेत. ३ एकर गोबी यशस्वीरित्या लागवड करून, महेश हे दाखवून देतात की समर्पण आणि आधुनिक तंत्रांचे मिश्रण उत्पादकतेत उल्लेखनीय परिणाम कसे देऊ शकते.



महेशचा प्रवास शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुरू झाला, त्याने आपल्या समुदायात रुजून राहण्याचा आणि शाश्वत शेतीसाठी वचनबद्ध राहण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय केवळ त्यांचे भूमीवरील प्रेमच दर्शवत नाही तर या आवश्यक क्षेत्रात सकारात्मक प्रभाव पाडण्यास उत्सुक असलेल्या तरुणांमध्ये वाढत्या ट्रेंडला देखील दिसत आहे.. त्यांची कहाणी प्रेरणादायी आहे, जी सिद्ध करते की शेतकऱ्यांची पुढची पिढी अधिक समृद्ध भविष्याकडे नेऊ शकते. महेश ज्या बारकाईने लागवड प्रक्रिया वापरतो ती त्याच्या समर्पणाची साक्ष देते. रोपांसाठी ३० दिवसांच्या काळजीपूर्वक तयारीच्या कालावधीने सुरुवात होते, त्यानंतर 3 महिने संगोपनाची वाढ होते. ही कठोर पद्धत यशस्वी शेती प्रयत्नांमध्ये नियोजन आणि अंमलबजावणीचे महत्त्व अधोरेखित करते. प्रगत कृषी तंत्रज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रयोगांमुळे महेश यांना उत्पादन पातळीत लक्षणीय वाढ करता आली आहे, ज्यामुळे या प्रदेशातील इच्छुक शेतकऱ्यांसाठी एक बेंचमार्क निर्माण झाला आहे. महेशला फक्त त्याचे वैयक्तिक यशच नाही तर इतर तरुण शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण म्हणून त्याची भूमिका देखील वेगळी ठरवते. त्याचा प्रवास समवयस्कांना आधुनिक शेती पद्धती स्वीकारण्यास प्रोत्साहित करतो, त्यांना त्यांच्या पद्धतींमध्ये उत्कृष्टता आणि नावीन्यपूर्णतेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देतो. महेश आपले ज्ञान आणि अनुभव शेअर करत असताना, आधुनिक शेतीच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार असलेल्या दूरगामी विचारसरणीच्या शेतकऱ्यांचा समुदाय तयार करत आहेत. त्यांच्या प्रयत्नांद्वारे, महेश बल्लेवार केवळ त्यांच्या स्वतःच्या क्षेत्रात परिवर्तन घडवत नाहीत तर शेतीमध्ये युवा सक्षमीकरणाच्या व्यापक कथेतही योगदान देत आहेत. त्यांच्या यशोगाथेतून तरुणांनी त्यांच्या समुदायांमध्ये शाश्वतता वाढविण्यासाठी आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला जातो. महेश हे या जबाबदारीचे नेतृत्व करत असताना, ते केवळ पिकेच नव्हे तर शेतीच्या भविष्याला दिशा देण्यासाठी सज्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या एका नवीन पिढीची लागवड करत आहेत. पारंपारिक शेतीला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत असलेल्या जगात, महेश आशा आणि नाविन्यपूर्णतेचे प्रतीक म्हणून उभे आहेत, आणि हे सिद्ध करतात की उत्कटतेने आणि चिकाटीने, तरुण खरोखरच कृषी परिदृश्याला चांगल्यासाठी आकार देऊ शकतात.

## नेरे हायस्कूल येथे शौचालयांचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



शनिवार एक मार्च रोजी जनसेवा संघ संस्थेच्या नेरे हायस्कूल, पनवेल येथे नृत्यांजली संस्था भांडुप, मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी चार शौचालय बांधून दिले. नृत्यांजली संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार गुहा यांच्या अध्यक्षतेखाली प्रीती कुमारी कंट्री हेड, एनओव्ही यांच्या निधीतून आणि संस्थेचे सदस्य अनोना गुहा, गिरीश दळवी, चारुशीला समजिसकर माजी नगरसेविका, आणि जनसेवा संघ संस्थेचे उपाध्यक्ष बाळकृष्ण गवते, सचिव टी.डी म्हात्रे यांच्या उपस्थितीत शौचालयाचे उद्घाटन पार पडले. यावेळी वाजे हायस्कूल मुख्याध्यापक माळी सुरेश आणि नेरे हायस्कूल मुख्याध्यापक धोत्रे डी. एस यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

## जालना जिल्हा उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक फारुक भाई कुरेशी याची निवड

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- ज्ञानेश्वर कुं निकाळजे
वरूड/ जाफ्राबाद



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार साहेब यांचे अत्यंत विश्वासू राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार लोकनेते अरविंद अण्णा चव्हाण साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जाफराबाद शहरातील माजी नगरसेवक माननीय फारुख भाई कुरेशी यांची जालना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड.. आमचे स्नेही मित्र एडवोकेट विनोद जी डींगे साहेब यांची जाफराबाद न्यायालय वकील संघाच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जिल्ह्याच्या वतीने येथोचित सत्कार.. माजी नगरसेवक तथा उद्योजक माननीय बाळू भाऊ हिवाळे यांची जाफराबाद उपाध्यक्षपदी निवड.. आमचे स्नेही मित्र एडवोकेट विधीतज्ञ सचिन साहेबराव सोरमारे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष प्रवेशासह कार्याध्यक्ष जाफराबाद पदी निवड करण्यात आली यावेळी जाफ्राबाद तालुका अध्यक्ष दत्तू पाटील अंभोरे साहेब , माणिकराव पाटील वायाळ.. सर्व पदाधिकारी मान्यवरांचे राष्ट्रवादीमय हार्दिक अभिनंदन पुढील राजकीय भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छ.,.

## पनवेल महापालिका क्षेत्रातील वळवली, टेंभोडे गावातील पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**




पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वळवली, टेंभोडे गावातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत आणि आदई ग्रामपंचायत हद्दीतील नेवाळी गावाला वळवली गावाचे पाणी बंद करुन पाणी दिल्याबद्दल शिवराज प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेने तीव्र संताप व्यक्त करून आज पनवेल महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता चव्हाण यांची भेट घेवून या संदर्भात त्यांना निवेदन दिले आहे. यावेळी शिवराज प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विश्वास पेटकर, शिवमंदिर कमिटी अध्यक्ष मारुती पाटील, अशोक कान्हा पाटील, मा.सरपंच वळवली दिलीप पाटील, शाखाप्रमुख वळवली प्रवीण पाटील आदींनी या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली. संघर्ष करून मिळवलेल्या पाण्यासाठी पुन्हा संघर्ष करण्याची वेळ आलेली आहे. पनवेल महानगर पालीका हद्दीतील वळवली गावात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई झाली असून पाच दिवसातुन एकदाच पाणी मिळते, त्यामुळे ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागतो. वळवली, टेंभोडेला आलेल्या पाण्याच्या लाईनमधून परस्पर आदई ग्रामपंचायत हद्दीतील नेवाळी गावाला जोडुन महानगरपालिका हद्दीतील वळवली ग्रामस्थांवर अन्यायच केला आहे. पाणीपुरवठा कमी येतो म्हणून टॅंकरने पाणी पुरविले जाते. ते पण अपूर्णच असते. टॅंकर लांबीने केलेली कृत्रीम पाणीटंचाई आहे असे वाटते. तरी तातडीने याची दखल घेवून वळवली, टेंभोडेचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात सूचना कराव्यात व त्याची अंमलबजावणी करण्यास सांगावे अन्यथा आगामी काळात मोर्चा आंदोलन, उपोषण, घेराव यापैकी कोणताही प्रकारचा अवलंब केला जाईल असा इशारा अध्यक्ष विश्वास पेटकर यांनी दिला आहे.

## गाव खेड्यातील पादंण रस्ते, स्मशानभूमी संदर्भात अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन आजपासून आपल्या दारी...... तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी**
**गिरमाजी सुर्यकार**



ग्रामीण भागातील गावकऱ्यांचा व शेतकऱ्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला पांदण रस्त्याचे प्रलंबित प्रश्न शेतकऱ्यांना शेतमाल ने आण करण्यासाठी होणारी अडचण लक्षात घेता महसूल विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत मुख्यमंत्री महोदयाच्या शंभर दिवसाचा कृती कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावातील स्मशानभूमी पाहणी आणि पांदण रस्ते पाहणी करून अडचणी उद्भवल्यास त्या तात्काळ त्या ठिकाणी सोडवण्यासाठी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचारी यांचे पथक गठित करून मार्च महिन्यात उद्यापासून धर्माबाद तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यामध्ये हे पथक जाणार आहे . गावकऱ्यांना नम्र निवेदन आहे की त्यांनी या पथकाला भेटून आपल्या अडचणी सांगाव्यात. जास्तीत जास्त रस्ते लोकसहभागातून मोकळे झालेले रस्ते मजबुती करण्यासाठी देखील प्रस्तावित करावेत असे आव्हान धर्माबाद तालुक्याचे तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी केले आहे.

गाव तिथे स्मशानभूमी आणि पक्के रस्ते यासाठी हे शासन कटिबद्ध असून मुख्यमंत्र्यांचा शंभर दिवसाचा कालावधी पूर्ण होत असतानाच महाराष्ट्रातल्या प्रत्येक गाव खेड्यामध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. यामधून शेतकऱ्यांचा सर्वात मोठा प्रश्न असलेला शेतीकडे जाणारा पांदण रस्ता अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना स्वतःचा माल ने आण करण्यासाठी गाव नकाशावर नोंदी नसलेले अनेक रस्ते आहेत परंतु शेतकऱ्यातील आपापसात तंटे निर्माण होऊन या ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व संमतीने प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. कारण मजबूत रस्ते झाले तर विविध पीक घेऊन शेतकरी समृद्ध होऊ शकतो असेही मत तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी व्यक्त केले आहे.

सदरील पथकामध्ये धर्माबाद तालुक्यातील नायब तहसीलदार गावंडे, पंडित राठोड, शिवाजी जाकापुरे, कृष्णा सातपुते, मंडळ अधिकारी तेजस कुलकर्णी, वर्षा कुलकर्णी, अनिल लोहटे, अनिता गोपीनवार व भुमिअभिलेख विभागाचे सचिन आढाव, ईंदू गजभारे, आदबसिंग सिंग जारवाल,शिल्पा पैडीवार, यांचा समावेश असलेले महसूल विभागाचे पथक असल्याची माहिती तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी यांनी दिली आहे उद्यापासून हे पथक तालुक्यातील सर्व गावांमध्ये दिलेल्या नियोजनानुसार पोहोचणार आहे.

## डॉ.भारती बावदाने व शिवसेना विधानसभाप्रमुख डॉ.सुबोध बावदाने यांच्या वतीने कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांचा सत्कार सोहळा संपन्न ; आशीर्वाद युवा मंडळाच्या शेडचे उद्घाटन

### हनुमान नगर मधील प्रलंबित एसआरए प्रकल्पाचे काम मार्गी लावण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार - मंत्री भरतशेठ गोगावले

**दैनिक युवक आधार**
**विक्रोळी,(केतन भोज);**

पश्चिम येथील शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ च्या माजी नगरसेविका डॉ.भारती बावदाने व शिवसेना विधानसभाप्रमुख डॉ.सुबोध बावदाने यांच्या वतीने महाड – पोलादपूर विधानसभा मतदार संघातून सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आलेले कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांचा जाहिर सत्कार सोहळा आशीर्वाद युवा मंडळ,आशीर्वाद सोसायटी,हनुमान,विक्रोळी पार्कसाईट याठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला.आशीर्वाद युवा मंडळ,आशीर्वाद सोसायटी,हनुमान नगर येथील डॉ.भारती बावदाने व शिवसेना विधानसभाप्रमुख डॉ.सुबोध बावदाने यांच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या भव्य शेडचे उद्घाटन मंत्री भरतशेठ गोगावले,शिवसेना ज्येष्ठ नेत्या मीनाताई कांबळी व शिवसेना प्रवक्त्या तथा सचिव शितल म्हात्रे यांच्या शुभहस्ते पार पडले.तसेच विभागातील सर्व लाडक्या बहिणींसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे देखील आयोजन यावेळी करण्यात आले होते.या कार्यक्रमाला लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.शिवसेना नेत्या मीनाताई कांबळी तसेच प्रवक्त्या तथा सचिव शितल म्हात्रे यांनी उपस्थित सर्व लाडक्या बहिणींसोबत संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले. विक्रोळी पश्चिम हनुमान नगर येथील प्रलंबित एसआरए प्रकल्पाचे काम






मार्गी लावण्यासाठी लवकरच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच याबाबत योग्यतो पाठपुरावा करून सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सांगितले.भरतशेठ गोगावले हे महाड – पोलादपूर विधानसभेचे आमदार आहेत. तसेच प्रभाग क्रमांक १२३ मध्ये महाड – पोलादपूर वासिय यांची संख्या अधिक असल्यामुळे तेही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.तरी येणाऱ्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत डॉ.भारती बावदाने यांना प्रचंड मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.असे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी उपस्थितांना सांगितले.

# यश प्राप्तीसाठी प्रामाणिक व सकारात्मक दृष्टिकोन महत्वाचा - डॉ. देवानंद शिंदे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स स्वायत्त कॉलेज महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर वर्षाच्या वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा आज (दि. ०३) सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात समारंभपुर्वक मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठचे माजी कुलगुरू व मुंबई विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू, डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास जनार्दन भगत





शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, भागूबाई चांगु काना ठाकूर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. सानवी देशमुख आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभली. या प्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स विद्याशाखांचे प्रमुख आणि विविध विभागांचे प्रमुख मंचावर मान्यवरांसोबत उपस्थित होते. सोहळ्याचे प्रमुख पाहुणे डॉ. देवानंद शिंदे यांनी आपल्या भाषणात नॅक मुल्यांकन प्राप्त केल्याबद्दल सीकेटी महाविद्यालयाचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना संबोधित करताना, भविष्यात यश मिळवायचे असेल तर प्रामाणिक राहिले पाहिजे व सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे, असे सांगितले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले की कारणे सांगणारी माणसे मोठी होत नाहीत आणि मोठी माणसे कारणे देत नाहीत असे मार्गदर्शक तत्व सांगत तंत्रज्ञानाच्या जोरावर यश प्राप्त करता येते म्हणून भविष्यात संशोधन, तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे, असे नमूद केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही उत्कृष्ट शिक्षण संस्था या ठिकाणी प्रत्येकाला संधी मिळत असते, त्यामुळे हि संस्था मोठी झाली आहे, असे सांगत संस्थेचे कौतुक केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्यांने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे व संघर्ष हाच यशाचा मार्ग आहे. जीवनात पदवी टप्पा महत्वाचा असतो ती तुम्ही तुमच्या बुद्धिमत्तेच्या बळावर मिळवली आहे. हि पदवी घेऊन शांत राहू नका तर पुढच्या पदव्या पण प्राप्त करा असा मौलिक सल्ला देऊन विद्यार्थ्यांना पुढच्या भविष्यातील वाटचालींसाठी शुभेच्छा दिल्या. या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यामध्ये पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र तसेच विद्यावाचस्पती प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या शानदार समारंभामध्ये एन.सी.सी. च्या पथकाने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. या सोहळ्याची सुरुवात सुरेल राज्य गीताने झाली. त्यानंतर प्राचार्य मा. प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. तसेच प्रमुख पाहुण्यांची ओळख इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. व्ही. येवले यांनी करून दिली. या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगु काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो . डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीक्षा नियंत्रक प्रो. डॉ. एस. आय. उन्हाळे, विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्षा डॉ. एम. ए. म्हात्रे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याचे आभार प्रदर्शन परीक्षा नियंत्रक प्रो. डॉ. एस. आय. उन्हाळे यांनी केले. प्रा. डॉ. आर. व्ही. येवले , प्रा. ए. व्ही. पाटील आणि प्रा. डॉ. गीतिका तंवर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी अन जनतेच्या सुविध्येसाठी; मनसे भेट रिझल्ट थेट

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखा- पोयनाड, ता.अलिबाग बॅंकेत गेले असता येथिल अपंग व वृद्ध ग्राहकांसाठी उपलब्ध सेवेचा नोटीस बोर्ड इमारतीच्या पायर्यां जवळ इंग्रजीत असल्यामुळे तो ग्रामिण भागातील सामान्य ग्राहकांना समजत ही नव्हता. या फलका बद्दलची माहिती मिळाल्या नंतर सदर बॅंकेला श्री देवव्रत विष्णू पाटील मनसे, शॅडो कॅबिनेट सदस्य व राजेश टेमकर यांनी दिनांक ०१ मार्च २०२५ रोजी दुपारी ४ वाजता भेट देऊन सदरचा सुचना फलक ग्राहकांना सहज समजावे यासाठी मराठीत व रंगीत करावे जेणे करून ग्राहकांची लगेच नजर जाईल असे करा, अशी सुचना बॅंकेच्या मॅनेजरांना केली ती त्यांनी लगेच मान्य केली तसेच संध्याकाळपर्यंत आपल्या सुचने प्रमाणे कारवाई करतो असे सांगितले.




सदर मराठीतल्या सुचना फलकामुळे गरजवंत ग्राहकांना बॅंकेच्या सुविधेचा लाभ घेता येईल.. असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देवव्रत विष्णू पाटील मनसे, शॅडो कॅबिनेट सदस्य यांनी सांगितले.

# रहिमतपूर नगरपालिका नाव बदलण्यास स्थानिकांचा विरोध


**कराड**

इंग्रजांच्या जोखडातून देशाला मुक्त करत स्वातंत्र्य मिळवून देण्यापासून ते महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये सिंहाचा वाटा असणाऱ्या कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर नगर पालिकेची स्थापना स्वातंत्र्यापूर्व काळात इंग्रजांनी इ. स. १८५३ मध्ये केली असून ही भारतातील पहिल्या क्रमांकांची स्थापन केलेली नगरपालिका ठरते. आता हिंदुत्ववादी विचारधारेच्या राज्य सरकारमुळे रहिमतपूरसारख्या नावलौकिक प्राप्त शहराचे नाव बदलण्याची भाजप मंत्री यांच्या घोषणेबाजीनंतर रहिमतपूर नाव बदलण्यास मोठ्या प्रमाणात विरोध केला जात आहे. यामुळे भारतीय जनता पक्ष चांगलाच अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सातारा जिल्ह्याला दीर्घ ऐतिहासिक परंपरा आहे तसेच रहिमतपूरलाही खूप मोठा इतिहास आहे. छ. शिवाजी महाराज व अफजल खान भेटीच्यावेळी प्रतापगडाच्या रणसंग्रामात सहभागी होण्यासाठी अफझल खानासोबत वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी, सय्यद बंडा यांच्याबरोबरच अफजल खानाच्या मदतीसाठी रहिमत खानलाही विजापूरवरून वाईला सैन्यासह पाठवले होते. वाटेत रहिमत खानाने कमंडलू नदीकाठावर काळीशार जमीन पाहून तेथे आपली छावणी टाकली. याच छावणीचे पुढे छोट्या रहिमतपूर गावात रूपांतर झाले. आजही हे गाव रहिमत खानाच्या नावाने 'रहिमतपूर' म्हणून ओळखले जाते तर दुसऱ्या बाजूला ज्यावेळी साधुंनी रणदुल्ला खानास दीक्षा दिली त्यावेळी त्याला अत्यानंद झाला आणि रणदुल्ला खान परमेश्वरास उद्देशून म्हणाला, 'माझ्यावर फार मोठी दया म्हणजे राहमत केली आहे.' रणदुल्ला खानाने या ठिकाणाला रहिमतपूर म्हणजेच या गावाला रहिमतपूर नाव दिल्याचा संदर्भ आर. पी. माने यांच्या 'रहिमतपूर नगरी' या लेखात आढळतो.

पेशव्यांच्या कारकीर्दीत त्यांची एक टांकसाळ रहिमतपूरला होती. येथे मोहरा, रुपये, चांदीची नाणी व पैसे या टांगसाळीत तयार केले जात होते. रहिमतपूर गावाचे असेही काही ऐतिहासिक संदर्भ सापडतात. त्यामुळे आता या गावाचे रहिमतपूर हे नाव साता समुद्रापलीकडे पाठवण्याचे काम कवी गिरीश, पद्मश्री वसंत कानेटकर, गो. पू. देशपांडे, डॉ. राजेंद्र शेंडे, गायिका बेला शेंडे, व्याख्याते नितीन बानगुडे, अण्णा देशपांडे, स्वातंत्र्य सैनिक सोपानराव घोरपडे, सरदार बाळासाहेब माने आणि अलीकडच्या काळामध्ये गुलाबराव माने, चित्रलेखा माने कदम, सुनील माने, वासुदेवराव माने, ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत, भरत शेडगे अशा अनेक रथी महारथी यांच्यामुळे परिचित झाले आहे. त्यांना रहिमतपूर नाव बदलून दुसरे कुठले नाव द्यावे, असे कधीही वाटले नाही. दरम्यान, रहिमतपूरचे नाव रघुनाथपूर जाहीर करून गुढी उभारण्याचे आवाहन केले होते. परंतु, त्याला थंड प्रतिसाद मिळाला होता. महायुतीचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुन्हा एकदा नामांतराची हाक दिली. पण रहिमतपूर विकासासाठी एक रुपया निधीची घोषणा न केल्यामुळे या नामांतराला आता तीव्र विरोध होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### सर्वधर्म समभावाची शिकवण तेवत ठेवण्याची गरज



शेक्सपियर यांनी म्हटले नावात काय आहे? पण अलीकडे विकासकामे, धोरणात्मक निर्णयापेक्षाही हिंदू मुस्लिम ऐक्याला बाधा येईल, असे कुणीही कृत्य करू नये. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख व्हावी. म्हणून युती सरकारने शिवशाही बस असे नामकरण केले. आज स्वारगेट पुणे येथील एसटी बसमधील प्रकारामुळे सध्या शिवशाही हे नाव गाजत आहे, याची खंत वाटते. नाव बदलण्यापेक्षा आपली मानसिकता बदलून सर्वधर्म समभावाची शिकवण तेवत ठेवावी, अशी मागणी आता पुढे आलेली आहे.

# माजी खासदार खतगावकर राष्ट्रवादीच्या वाटेवर

**नांदेड**

दोन वेळा काँग्रेस आणि दोन वेळा भाजप असा राजकीय प्रवास असलेले ज्येष्ठ नेते व माजी खासदार भास्करराव पाटील-खतगावकर यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी भेट घेतली. रात्री दहाच्या सुमारास मुंबईला रवाना होण्यापूर्वी आपला ताफा खतगावकर यांच्या राजेंद्रनगर येथील निवासस्थानी वळवून त्यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यामध्ये दहा मिनिटे बंद दाराआड चर्चा झाली. चर्चा काय झाली; हे मात्र समजू शकले नाही, पण या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, माजी खासदार भास्करराव पाटील-खतगावकर हे राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याची चर्चा देखील सुरू आहे.

माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर हे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे सख्खे दाजी आहेत. तीन वेळेस आमदार आणि तीन वेळेस खासदार होते. २०१४ साली त्यांनी काँग्रेस सोडून भाजपामध्ये प्रवेश केला होता, नंतर पुन्हा ते काँग्रेसमध्ये आले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर पुन्हा भास्करराव खतगावकर काँग्रेस सोडून भाजपमध्ये आले. विधानसभा निवडणुकीदरम्यान खतगावकर यांनी पुन्हा पक्ष बदलला.

काँग्रेसमध्ये येऊन त्यांनी आपली स्नुषा डॉ. मीनल पाटील-खतगावकर यांना नायगाव मतदारसंघातून काँग्रेसची उमेदवारी मिळवून दिली. मात्र, विधानसभेत डॉ. मीनल पाटील खतगावकर यांचा दारुण पराभव झाला. दरम्यान, शुक्रवारी उपमुख्यमंत्री अजित पवार हे नांदेड आणि परभणी दौऱ्यावर आले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपला ताफा खतगावकर यांच्या निवासस्थानी वळवला. यावेळी दोघांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली.

### नांदेडच्या राजकारणात उलथापालथ होणार



विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नांदेड दौऱ्यावर आले होते. दौऱ्या दरम्यान शिंदे हे देखील माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे मेहुणे भास्करराव पाटील-खतगावकर यांच्या निवासस्थानी भेट देणार होते, मात्र, भेट झाली नाही. आता राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी भेट घेतली. भेटीचे कारण काय होते, बंद दाराआड काय चर्चा झाली, हे मात्र समजू शकले नाही, पण या भेटीनंतर नांदेडच्या राजकारणात मोठी उलथापालथ होणार असल्याची चर्चा आहे.

## निवडक

### सातारा जिल्ह्यात महास्वच्छता अभियान

**कराड :** नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीचे औचित्य साधत रविवारी संपूर्ण जिल्ह्यात सहा ठिकाणी शहरी भाग,बाजारपेठा,रस्ते, सोसायट्या,शासकीय कार्यालयात महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. सातारा जिल्ह्यातील सातारा, कराडसह कोरेगाव, वडूज, पाटण, वाई येथे हे अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत ३३ टन ३८० किलोग्रॅम कचरा २७०२ श्री सदस्यांसह शेकडो स्थानिकांनी संकलित करून कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली.

### सरकारी कामात अडथळाप्रकरणी गुन्हा

**नांदेड :** माहूर तालुक्यातील वडसा येथील नागोबा मंदिर परिसरात गस्तीवरील तलाठी ओमकार धनवे व अभिजीत कुडमते यांना मारहाण करून धमकी दिल्याप्रकरणी सिंदखेड पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तलाठी ओमकार धनवे व अभिजित कुडमेते यांनी शुक्रवारी पडसा येथील पैनगंगा नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून त्याची वाहतूक करणारा ट्रॅक्टर थांबवून चालकाकडे तसे परवाना पत्र आहे का, अशी विचारणा केली. परंतु, त्याच्याकडे तसा कुठलाही वैध परवाना त्यांना आढळून आला नाही. त्यामुळे सदर ट्रॅक्टर ताब्यात घेण्याचा त्यांनी प्रयत्न केल्यावर ' ट्रॅक्टरची चावी द्या, नसता तुमचे बरे वाईट होईल' अशी धमकी देऊन चालकाने ट्रॅक्टर घेऊन पळ काढला. गस्ती पथकातील तलाठी ओमकार धनवे यांच्या फिर्यादीवरून शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, ताब्यातील वाहन पळवून नेणे, दमदाटी करणे यासह इतर कलमांखाली सिंदखेड पोलिसांनी केवळ एकाच व्यक्तीवर गुन्हा नोंद केला आहे.

### श्री सदस्यांतर्फे उरण शहरात स्वच्छता मोहीम

**उरण :** महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा या प्रतिष्ठानमार्फत श्रीसमर्थ बैठकीच्या माध्यमातून रविवारी उरण शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत उरण तालुक्यातील १ हजार ७१४ श्री सदस्यांनी सहभाग घेतला. उरण शहरातील सावरकर मैदान, शासकीय कार्यालयांची आवारे आणि शहरातील अडगळीच्या ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत १५.७९ टन ओला कचरा आणि २५.४३ टन सुका कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेत श्री सदस्यांबरोबर नागरिक सहभागी झाले होते.

# एसटी बसस्थानकांचे सुरक्षा ऑडिट सुरू

## एसटी प्रशासन खडबडून जागे



**कराड :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सातारा विभागातील मेढा आगार व बसस्थानकाचे शनिवारपासून सुरक्षा ऑडिट महामंडळाच्या सुरक्षा यंत्रणेसह अन्य अधिकाऱ्यांमार्फत सुरू करण्यात आले आहे. सातारा विभागातील सर्वच बसस्थानके व आगारांचे टप्प्याटप्प्याने हे सुरक्षा ऑडिट केले जाणार आहे.

स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये युवतीवर अत्याचाराची घटना घडल्यानंतर एसटी प्रशासन खडबडून जागे झाले आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महामंडळाच्या सर्व विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेवून सर्व बसस्थानक व आगारांचे सुरक्षा ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

यामध्ये बसस्थानकाचे क्षेत्रफळ, सीमा सुरक्षा भिंत उंची व विस्तार, दैनिक प्रवासी संख्या, दररोज बसेसच्या फेऱ्या, रात्र मुक्काम बसेसची संख्या, सुरक्षारक्षकांची संख्या, पोलीस चौकी आहे का? २४ तास पोलीस उपलब्ध असतात का? सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या, सीसीटीव्हीमध्ये न येणाऱ्या ब्लॅक स्पॉटची संख्या यासह अन्य माहिती या सुरक्षा ऑडिटच्यावेळी घेण्यात येत आहे.

यासाठी स्थानिक पोलीस व एसटी प्रशासन, सुरक्षा यंत्रणेचे अधिकारी काम करत आहेत. सुरक्षा ऑडिटमध्ये प्रामुख्याने प्रवाशी सुरक्षितता, स्थानकात पुरेशी प्रकाश व्यवस्था आहे का? सुरक्षारक्षक नेमणूक करण्याची ठिकाणे, उभ्या केल्या जाणाऱ्या बसेस, महिला सुरक्षेसाठी महिला सुरक्षारक्षक, चौकशी कक्षात महिला अधिकाऱ्यांची नेमणूक आदी गोष्टींवर प्रामुख्याने लक्ष देण्यात येत आहे.

सातारा विभागात साताऱ्यासह कराड व फलटण या सर्वात मोठ्या बस स्थानकांसह मेढा, महाबळेश्वर, पाटण, वडुज, दहिवडी, कोरेगाव, खंडाळा-पारगाव, वाई, लोणंद व म्हसवड बसस्थानक आदींचे यामध्ये सुरक्षा ऑडिट केले जाणार आहे.

# गतिमान न्यायासाठी पायाभूत न्यायिक सुविधा देणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**पोलादपूर :** गतिमान पद्धतीने न्याय मिळावा, यासाठी पायाभूत न्यायिक सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असल्याची ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाड येथे बोलताना दिली.

महाड येथील कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाच्या प्रस्तावित नव्या इमारतीचे भूमीपूजन आणि कोनशिला समारंभ रविवारी न्या.भूषण गवई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराध्ये, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मकरंद कर्णिक, न्या. मिलिंद साठये, रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष सुरेंद्र तावडे, रायगडच्या प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ. सृष्टी निलकंठ, महाडचे वरिष्ठ स्तर जिल्हा न्यायाधीश प्रवीण उन्हाळे, महाड वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. संजय भिसे, राज्यसभेचे खा. धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळेस बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, न्यायालयाच्या या इमारतीसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चवदार तळ्यावर केलेला पिण्याच्या पाण्याचा सत्याग्रह हा देशाची दिशा आणि दशा बदलणारा सत्याग्रह होता. अस्पृश्यता हे जगातील सर्वात मोठे पाप आहे, असा संदेश त्यांनी याच भूमीतून दिला म्हणून महाडची भूमी महत्त्वाची आहे, असेही त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी, न्याय समाजातील शेवटच्या माणसाच्या दारात पोहोचला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या भाषणात न्या. भूषण गवई यांनी महाड येथील चवदार तळे सत्याग्रहानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला कायदेशीर लढा विस्तृतपणे कथन करताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १० वर्षे कायदेशीर लढा देत चवदार तळ्यावर सर्वांचा हक्क असल्याचे मान्य करून घेतला असल्याचे सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, २०१२ मध्ये महाड शहरात आलेल्या महापुराच्या वेळेस, बाधित झालेल्या महाड न्यायालयाच्या इमारतीमधील जास्तीत जास्त दस्तावेज वाचविण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा, निधी आपण उपलब्ध करून दिल्याची आठवण करून दिली. दूध डेअरीच्या जागेत न्यायालयाची नवी इमारत होत आहे. त्यामुळे दूध, का दूध, पानी का पानी अशा पद्धतीने वेगाने न्याय देण्याचे काम या न्यायालयातून होईल, असा विश्वासही शिंदे यांनी व्यक्त केला.

महायुती सरकार आल्यानंतर राज्यात ४२ न्यायालये बांधण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. महाड न्यायालयाची प्रस्तावित इमारत विक्रमी वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

# शिवाजी विद्यापीठाच्या नामविस्तारासाठी मोर्चा



**कोल्हापूर :** कोल्हापूर येथील 'शिवाजी विद्यापीठ' या नावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपूर्ण उल्लेख असल्याने विद्यापीठाचे नाव अधिक सन्माननीय आणि पूर्ण स्वरूपात 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' असे करण्यात यावे, या मागणीसाठी सोमवारी १७ मार्चला कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. नामविस्ताराचा हा मोर्चा पूर्ण शक्तीनिशी यशस्वी करण्याचा निर्धार कावळा नाका येथील 'गीता मंदिर' येथे मोर्चाच्या नियोजनासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

हिंदु राष्ट्र समन्ववय समिती आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या वतीने आयोजित या बैठकीसाठी विविध संप्रदाय, गडप्रेमी संघटना, वारकरी संप्रदाय, आध्यात्मिक संघटना, तरुण मंडळे, हिंदुत्वनिष्ठ संघटना, पक्ष यांचे २०० हून अधिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवी मुंबई आर टी ओ येथे लर्निंग साठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना व्याखान देणेसाठी दिलीप किसनराव आमले यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**

त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती सादरकर्ते व्यसनमुक्त जिवन काळाची गरज माध्यमातून गेल्या १७/१८ वर्षापासून रिक्षा, टॅक्सी, ट्रक, टेम्पो,बस तसेच शाळा,कॉलेज, महाविद्यालय, सामाजिक संस्था प्रादेशिक परिवहन विभाग, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक विभाग, नवी मुंबई महानगरपालिका शाळा कॉलेज महाविद्यालय अशाप्रकारे ३० हजार पेक्षा अधिक नागरिक व मुलांना वाहतूक दारांन बरोबर व्यसनमुक्ती संवाद साधुन व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन केले त्याबद्दल 2016 आदर्श युनियन चालक,2017 आदर्श पोलीस मित्र, 2022 आदर्श व्यक्ती,2023 दैनिक युवक आधार,2024 छत्रपती संभाजी राजे राज स्तरीय पुरस्कार, आदर्श व्यक्ता पुरस्कार, आदर्श व्यसनमुक्ती विशेष पुरस्कार, 2025 उत्कृष्ट गौरव अशाप्रकारे 100 पेक्षा जास्त पुरस्कार व आदर्श गौरव सन्मान विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे नवी मुंबई मधील हजारो नवीन लायसन्स काढण्यासाठी येणारे शिकावु विध्यार्थ्यांना दर गुरुवारी परिवहन विभाग च्यावतीने अधिकृतपणे रस्ता सुरक्षा अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती व्याख्यान देण्यासाठी मा श्री गजानन गावंडे साहेब सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई यांच्या हस्ते पत्र देऊन श्री दिलीप किसनराव आमले यांची नियुक्ती केली आहे



# सिंगापूर इंटरनॅशनल शाळेच्या संचालकांविरोधात फसवणुकीचा गुन्हा




**भाईदर :** मीरारोड येथील सिंगापूर इंटरनॅशनल स्कूल या शाळेचे संचालक निलेश कमलकिशोर हाडा व विशाल ओमप्रकाश पोद्दार यांनी लायन पेन्सिल्स कंपनीचे संचालक किरण पटेल यांची ४४५ कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी काशीमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरारोडच्या राष्ट्रीय महामार्गावरील ठाकूर मॉल मागे लायन पेन्सिल्स लि. या कंपनीचे संचालक किरण पटेल (७१ ) यांच्या मालकीची जागा आहे. त्यांनी ८ एकर जागा ट्रेडवेल कंस्ट्रक्शन कॉर्पोरेशन लि.चे निलेश व रितेश कमलकिशोर हाडा आणि विनोद फुलचंद मित्तल यांना ९९ वर्षाच्या कालावधीसाठी २००६ साली ३ कोटी अनामत रक्कम व रु. १२०० वार्षिक नाममात्र भाड्याने दिली. अनामत रक्कम पैकी १ कोटी २० लाख दिले मात्र बाकी रक्कम दिली नाही. सदर जागा ट्रेडवेल कंपनीने बँकेकडे गहाण ठेवून २० कोटी रुपयांचे कर्ज घेतले व त्या जागेवर सन २००७ मध्ये सिंगापूर इंटरनॅशनल स्कूल सुरू केले.

या शाळेमध्ये किरण पटेल व त्यांची कंपनी यांना ४० टक्के भागीदारी देण्याचे कबुल केले व त्यानुसार करार करण्यात आला. मात्र एक संचालक दिल्लीत असल्याने त्यांची सही घेऊन येतो, सांगून त्या कराराची प्रत देखील दिली नाही. ट्रेडवेलचे संयुक्त खाते उघडण्यात आले मात्र धनादेशवर पटेल यांची स्वाक्षरी घेतली जात नसल्याने त्यांनी माहिती घेतली असता हाडा व मित्तल त्रिकुटाने दुसऱ्या बँकेत परस्पर खाते उघडून व्यवहार चालवल्याचे आढळले.

अनामत रकमेचे १ कोटी ८० लाख आणि २००७ पासूनचे भाडे रक्कम पटेल यांना न मिळाल्याने २०१४ साली त्यांनी करार रद्द करण्यात आल्याची नोटीस ट्रेडवेलच्या संचालकांना दिली. त्यानंतर लीज करार रद्द करण्याचा करार केला गेला. सदर वाद उच्च न्यायालयात गेल्यानंतर तेथे ट्रेडवेल आणि लायन पेन्सिल यांच्यात २०१५ साली समझोता झाला. ट्रेडवेल ने दर महिना ५१ लाख रुपये भाडे देण्याचे निश्चित झाल्याने लायन पेन्सिलची भागीदारी संपुष्टात आली.

निलेश हाडा व विशाल ओमप्रकाश पोद्दार बनावटगिरी करून पटेल यांची ८ एकर जागा, चटईक्षेत्र मिळून ४४५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी काशिमीरा पोलिसांनी २५ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करत आहेत.

### कर्जासाठी बँकेला खोटी माहिती

२०१९ साली भाडे कमी करण्यास पटेल यांनी नकार दिल्यानंतर निलेश हाडाने ट्रेडवेलच्या वतीने ठाणे न्यायालयात याचिका केली तसेच पोलिसांकडे तक्रार केली. कंपनीच्या मिनिट्सच्या नोंदीमध्ये हाडाने बैठकांना ३ संचालक हजर असल्याची कागदे पोलिसांना दिली. मात्र कंपनी ऑफ रजिस्टारकडे दिलेल्या मिनिट्समध्ये सर्व ५ संचालक बैठकांना हजर असल्याचे कळवले आहे. तसेच खोट्या नोंदी व मिनिट्स बनवले आहेत. एका बँकेतून ५ कोटींचे कर्ज घेण्यासाठी प्रस्ताव देऊन बँकेला खोटी माहिती देऊन निलेश हाडाने फसवले आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन

# काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा समतेचा संग्राम

**नाशिक :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा समतेच्या न्यायाच्या मानवतेच्या हक्कासोबतच मानवमुक्तीचा संग्राम ठरला आहे. जगभर मानवी हक्काच्या लढ्यातील समतेचा संगम म्हणून काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह लढ्याचा इतिहास आजही प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी नाशिक येथे केले.



काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या ९५ व्या वर्धापन दिनी काळाराम मंदिर पूर्व दरवाजा येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या कीर्तिमान शिलालेख येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास रामदास आठवले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बौद्ध भंते आणि सर्व बौद्ध उपासकांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली.

यावेळी रामदास आठवले यांच्यासह आठवले कुटुंबीय, सर्व बौद्ध उपासक, भदंत सुगत महाथेरो, भदंत राहुल बोधी महाथेरो रिपब्लिकन पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे आदी अनेकजण याप्रसंगी उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून दिलेला सर्वधर्म समभावाचा विचार देशाला तारणार आहे. आम्ही आता बौद्ध आहोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला मंदिर प्रवेशाचा नाही तर शाळा प्रवेशाचा संदेश दिला आहे. काळाराम मंदिरातील प्रवेशासाठी मंदिराचे महंत आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याचे हे यश आहे. आम्ही सर्वधर्म समभाव हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला विचार जोपासत आहोत. त्यामुळे आज आम्ही काळाराम मंदिरात प्रवेश केला असल्याचे रामदास आठवले यांनी सांगितले.